बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

निगमित संप्रेषण व निवेशक संबंध

प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5

टेलि - 020 25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार. 495

## बैंक ऑफ महाराष्ट्रकडून रिटेल व कृषी लाईफसायकल मॅनेजमेंट सिस्टिमचा प्रारंभ

पुणे दि. 11 सप्टेंबर, 2020 : देशातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकातील अग्रगण्य बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या डिजिटल कार्यक्षेत्राचा विस्तार वाढवत आहे. या दृष्टीने आपल्या रिटेल व कृषि कर्जासाठी लोन लाईफसायकल मॅनेजमेंट सिस्टिम (एलएलएमएस) ही प्रणाली भारतभरासाठी चालू करुन पुढचे पाऊल टाकले आहे.

बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री हेमंत टम्टा यांनी बँकेच्या प्रमुख कार्यालयात झालेल्या समारंभात या प्रणालीचे उद्‌घाटन केले. या प्रसंगी प्रमुख कार्यालयातील सरव्यवस्थापक तसेच बँकेच्या इतर कार्यालयातील अधिकारी व्हिडियो कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून उपस्थित होते.

उद्‌घाटन प्रसंगी आपल्या भाषणात श्री टम्टा यांनी सांगितले की एलएलएमएस मुळे कामकाजाचा खर्च कमी होईल. कर्ज प्रकरणांच्या प्रक्रियेचा वेग वाचेल, कर्ज प्रकरणांच्या छाननीचा दर्जा सुधारेल आणि ग्राहक संपर्क वाढून कर्ज वितरणातील अडचणी दूर होतील. नजीकच्या भविष्यात बँकेचे ग्राहक कर्जमागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने करु शकतील व अर्जांचा पाठपुरावा रियल टाईम मध्ये करता येईल.